दि. १४/०३/२०१९ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या हस्ते पोलीस क्लब, पहीला मजला, आझाद मैदान, मुंबई येथे आयोजीत करण्यात आलेल्या गुन्हे परिषदेत बक्षिस वितरण कार्यक्रमात सोबत जोडण्यात आलेल्या माहे जानेवारी –२०१९ या महिन्याचा " **BEST DETECTION OF THE MONTH** " चा पुरस्कार खालीलप्रमाणे प्रदान करण्यात आला आहे.

**बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ माहे जानेवारी – २०१९**

| | | |
|---|---|---|
| | **बिकेसी पोलीस ठाणे परिमंडळ–०८,** | **गु.र.क्र. ३३१/१८ कलम ४०९, ४२०, ४६५, ४६८, १२०(ब), ३४ भा.दं.वि.** |

**–: अन्यायाने विश्वासघात करुन फसवणुक:–**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :– फिर्यादी व २५ साक्षीदार हे भारत डायमंड बोर्स, बीकेसी याठिकाणी डायमंड विक्रीचा व्यवसाय करतात तर आरोपी यतीश फिछाडीया हा डायमंड दलालीचे काम करतो त्यामुळे व्यापाऱ्यांचा त्याच्यावर विश्वास होता. दिनांक ११/१२/२०१९ रोजी आरोपी यतिश फिछाडीया हा फिर्यादी व २५ साक्षीदार यांच्याकडून मोठया ग्राहकाकरीता डायमंडची आवश्यकता असल्याचे सांगून एकुण **२६,९१,२८,४३३/–** रूपये किंमतीचे डायमंड घेवून मार्केटमधून पळून गेला व डायमंडचा अप्रामाणिकपणे अपहार करून व्यापाऱ्यांची फसवणूक केला.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | :– | फिर्यादी श्री. सुरेश पोपटभाई बोरडा, हिं/पु., वय – ४५ वर्षे |
| **बळीत/मयत** | :– | फिर्यादी व २५ साक्षीदार |
| **चोरीस गेला माल** | | **रू.२६,९१,२८,४३३/– किंमतीचे डायमंड** |
| **हस्तगत माल** | | रू. २०,७७,८७,०६०/– किंमतीचे डायमंड व रोख रक्कम रूपये ३८,५०,०००/–<br>**एकुण मुल्य रूपये–२१,१६,३७,०६०/–** |
| **आरोपी अटक व दिनांक** | :– | १) श्री. सुरेश बैजनाथ मध्देशिया, वय ४२ वर्षे,<br>२) श्री. कामील मैनुद्दीन कुरेशी, वय ३८ वर्षे,<br>**अटक दिनांक २३/१२/२०१८**<br>३) श्री. केतन डायाभाई परमार, वय ३८ वर्षे,<br>**अटक दिनांक २५/१२/२०१८**<br>४) श्री. इमरान समशेर खान, वय ३५ वर्षे,<br>**अटक दिनांक ०३/०१/२०१९**<br>५)श्री. विशाल राजेशमोहन श्रीवास्तव, वय ३१ वर्षे,<br>**अटक दिनांक १३/०१/२०१९**<br>६) श्री. यतिश परेश फिछाडीया, वय ३१ वर्षे,<br>**अटक दिनांक २९/०१/२०१९**<br>७)श्री. राज बाबुभाई मन्सुरी, वय ३० वर्षे,<br>**अटक दिनांक २९/०१/२०१९** |

<u>**तपास कौशल्य**</u> :— गुन्हा उघडकीस आणण्यासाठी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पोलीस पथक तयार केले. गुन्हा घडल्यानंतर तात्काळ पोलीस पथकांने घटनास्थळी भेट देवून परिस्थितीचे बारकाईने विश्लेषण केले. घटनास्थळावरील फुटेज प्राप्त केली तसेच सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातून आरोपी एक नसून त्यापेक्षा जास्त असावेत असा अंदाज बांधला.

➢ गुन्हयामध्ये कोणताही दुवा नसताना तसेच आरोपीताच्या पत्नीने अर्नाळा सागरी पोलीस ठाणे विरार येथे त्यांचा पती हरविल्याबाबतची तक्रार देवून गुन्हयाचा तपास दुसऱ्या दिशेला नेण्याचा प्रयत्न केला. तरी देखील पोलीसांनी भारत डायमंड बोर्सच्या बाहेरील रस्त्यावरील फुटेज प्राप्त करून त्यामधील वाहनांची पाहणी करून त्यामधून संशयित ऑटोरिक्षा शोधून काढली. सदर परीसरातील डम डेटा काढून त्यामधून दोन मोबाईल क्रमांक टार्गेट करून तपास केला असता प्रथम दोन इसम नमूद गुन्हयात सहभागी असल्याची खात्री झाली. आरोपीतांना गुन्हयात वापरण्यासाठी सिम कार्ड देणारे इसम यांना प्रथम नमूद गुन्हयात अटक केली. त्यानंतर तांत्रिक पुराव्याच्या मदतीने नमूद गुन्हयात भारत डायमंड बोर्स येथेच दलाल व व्यापारी म्हणून काम करणारा इसम केतन परमार यास नमूद गुन्हयात अटक केली तसेच त्याच्याकडून १४५१.९९ कॅरेट वजनाचे डायमंड किं.रू. ३,९७,३१,६३५/—, रोख रक्कम रूपये २५,००,०००/— हस्तगत करण्यात आले.

➢ अटक आरोपीकडे केलेल्या तपासात त्यास कोणीतरी सल्ले देवून त्यास गुन्हयात मदत केली असावी अशी खात्री झाल्याने त्याचे वकीलाबाबत माहिती घेतली असता तोतया वकील श्री. विशाल श्रीवास्तव याचा नमूद गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने. आरोपी विशाल श्रीवास्तव यास नमूद गुन्हयात अटक करण्यात आली. विशाल श्रीवास्तव हा मुख्य आरोपी यतीश फिछाडीया याच्या संपर्कात असावा अशी शंका आल्याने तो मागील काही दिवसांत ज्या ज्या ठिकाणी गेला होता तेथील सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे फुटेज प्राप्त केली असता त्यामध्ये विशाल श्रीवास्तव हा पाहिजे आरोपी यतीश याच्या सोबत कल्याण रेल्वे स्टेशन येथून जात असल्याची माहिती प्राप्त झाली. तसेच विशाल श्रीवास्तव याच्याकडे केलेल्या तपासात त्याने यतीश फिछाडीयास भेटून त्यास २० हजार रूपये खर्चासाठी दिले असल्याचे व काही दिवस इलाहाबाद येथील कुंभमेळयात लपून राहण्याच्या सूचना दिल्याचे सांगितले. त्यावरून इलाहाबाद येथे कुंभमेळयात आरोपीचा शोध घेण्यासाठी एक पोलीस पथक पाठण्यिात आले होते व ते तेथे त्याचा शोध घेत होते व त्यांना दिलेल्या वॉटसअप नंबरचे लोकेशन प्राप्त करीत होते. तोतया वकिलाच्या मोबाईल फोनवर येणाऱ्या सर्व वॉटसअप कॉलची लोकेशन वारंवार प्राप्त करून एक मोबाईलधारक इलाहाबादवरून मुंबईत येत असल्याचे सेल आयडी लोकेशनवरून दिसून आल्याने त्यास कल्याण रेल्वे स्टेशन याठिकाणी पोलीस पथकाने सापळा लावून ताब्यात घेवून अटक केले. त्याच्या अंगझडतीत ८०२.५८ कॅरेट डायमंड किं.रू. २,७८,५३,२७०/— मिळून आले. त्याने नमूद गुन्हयातील काही मालमत्ता आरोपी राज मनुसरी याच्याकडे ठेवली असल्याचे सांगितल्याने राज मन्सुरी यास अटक करून त्याच्याकडून ४,०८८.३२ कॅरेट डायमंड किं.रू. १३,६४,२७,६५५/— व रोख रक्कम रूपये १३,५०,०००/— हस्तगत करण्यात आले. नमूद गुन्हयात इम्रान खान या आरोपीचा देखील सहभाग असल्याने त्यास गुजरात येथून ताब्यात घेवून नमूद गुन्हयात अटक केले आहे. कोणताही दुवा नसतांना तांत्रिक पुराव्यावरून आरोपी अटक करून त्यांचेकडे कौशल्याने तपास करून सदरचा मालमत्तेसंबंधिचा गंभीर गुन्हा उघडकीस आणला तसेच गुन्हयातील अपहार केलेल्या मालमत्तेपैकी सुमारे ८० टक्के मालमत्ता हस्तगत केली.

➢ सदरचा गुन्हा करण्यापूर्वी अटक आरोपीतांनी ज्या ठिकाणी बैठका घेतल्या होत्या तेथील सीसीटीव्ही फुटेज व पंचनामे, मोबाईल व सिमकार्ड खरेदी केलेल्या दुकानातील सेल्समन यांचे जबाब नोंद करून सदरचा गुन्हा हा फौजदारी पात्र कट रचून केला असल्याचे शोधून काढले.

➢ सदरचा संवेदनशील गुन्हा उघड झाल्याने मा. पोलीस आयुक्तांनी माहे जानेवारी २०१९ चे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ या पारितोषिकाने खालील अधिकारी व कर्मचारी यांना सन्मानित केले आहे.

बि.के.सी. पोलीस ठाणे, मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | ➢ अधिकारी व अंमलदाराचे नाव |
|---|---|
| 1 | वरिष्ठ पोलीस निरीक्षक/ कल्पना यशवंत गाडेकर |
| 2 | पोलीस निरीक्षक/प्रदीप राजाराम खानविलकर |
| 3 | सहाय्यक पोलीस निरीक्षक/सतिश रविंद्र बोराटे |
| 4 | पोलीस उप निरीक्षक/ गणेश शिवाजी तोडकर |
| 5 | पोलीस उप निरीक्षक/ अमित शंकर उतेकर |
| 6 | पोलीस हवालदार ९३४ / प्रदीप सदानंद नाईक |
| 7 | पोलीस हवालदार ३२५७७/ उत्तम श्रीपती पाटील |
| 8 | पोलीस नाईक ४६२३/दिपक गंगाधर ठाकरे |
| 9 | पोलीस नाईक ०१३१२/ नितीन उत्तम घोरपडे |
| 10 | पोलीस शिपाई ०६९७८/ गणेश तुकाराम ठोंबरे |
| 11 | पोलीस शिपाई ०७०८०७/योगेश रामनाथ काकड |